"उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती व भावनिक परिपक्वतेचे मापन : एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विद्यावाचस्पती
(पीएच.डी.) पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

: संशोधक :

दिपक रामचंद्र नावाडे

उच्च मा. शिक्षक

जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर

: मार्गदर्शक :

डॉ. गोरोबा तुकाराम खुरपे

प्राचार्य

मानवेंद्र केंद्रे अध्यापक महाविद्यालय, जळकोट जि. लातूर

जुलै - २०१६

अनुक्रमणिका

अ.क्र.	विवरण	पृष्ठ क्र.
१.	प्रस्तावना	३
२.	समस्या विधान	४
३.	कार्यात्मक व्याख्या	४
४.	संशोधनाची उद्दिष्टे	५
५.	संशोधनाची गृहीतके	५
६.	संशोधनाचे महत्त्व	६
७.	संशोधनाची गरज	६
८.	संशोधनाची व्याप्ती	७
९.	संशोधनाची मर्यादा	७
१०.	संशोधन पद्धती	८
११.	संशोधनाची साधने	८
१२.	जनसंख्या	८
१३.	नमुना निवड	८
१४.	प्रत्यक्ष कार्यवाही	८
१५.	प्रकरण योजना	९
१६.	संदर्भ सूची	१०

१. प्रस्तावना :-

मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना त्याच्या अंतर्गत व्यक्तिमत्त्वाचा व बाह्य व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. मानसशास्त्रामध्ये व्यक्तिमत्त्वाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात ते पुढील प्रमाणे होत. एक अंतर्गत व्यक्तिमत्त्व व दुसरे बाह्य व्यक्तिमत्त्व मानवाच्या व्यक्तिमत्त्व जडण-घडणीत अंतर्गत व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व अधिक असते. कारण विद्यार्थ्यांची संपूर्ण वाढ वविकास होत असताना शारीरिक वाढ व मानसिक वाढ अशी दोन प्रकारची वाढ होत असते. तेंव्हा शारीरिक वाढीमध्ये उंची, वजन, आकार, शारीरिक अवयव याची वाढ होत असते तर मानसिक वाढीमध्ये भावना, विचार, तर्क, बुद्धी इत्यादी बाबीचा समावेश होतो. संशोधक हा उच्च माध्यमिक विद्यालयात गत दहा वर्षापासून अध्यापनाचे कार्य करत असल्यामुळे संशोधकाला विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेविषयी अभ्यास करावासा वाटतो कारण त्यास अध्यापन करताना असे आढळुन आले आहे की विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता ही काळानुसार, वातावरणानुसार येत असते. विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयानुसार प्रगल्भता वाढत जाऊन त्याच्या एकंदरीत वर्तनामध्ये बदल होत असलेला जाणवतो. तो होणारा अपेक्षित बदल म्हणजे तो स्वतःला परिस्थितीअनुरूप व संस्कृतीअनुरुप समाजामध्ये कसे वागावे ? कसे वर्तन करावे ? कसे रहावे ? हे शिकत असतो अर्थात परिस्थितीशी जुळवून घेत असतो. कारण परिपक्वता ही विद्यार्थ्याला जीवनाचे हेतूपूर्ण करण्यासाठी व समाजामध्ये समायोजन साधण्यासाठी व यशस्वी जीवन जगण्यासाठी परिपूर्ण मदत करत असते.

आपले राहणीमन व जीवनमान उंचावण्यासाठी परिपक्वता ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे बहुतांश असे आढळून येते की ज्या विद्यार्थ्यांचे पालकत्त्व चांगले असेल त्याच्या परिपक्वतेत अधिक सुधारणा झालेली दिसते. मानसशास्त्राचा अभ्यास करताना वेग वेगळ्या पुस्तकात परिपक्वतेच्या वेग-वेगळ्या व्याख्या पहावयास मिळतात जसे परिपक्वता म्हणजे नैतिक मूल्याचे पालन करणे. सामाजिक आरोग्याचे भान ठेवणे धार्मिक सलोखा निर्माण करण्यास आपल्या वर्तनातून मदत करणे. तसेच त्या विद्यार्थ्यामध्ये राजकीय, भावनिक, लैंगिक आणि बौद्धिक परिपक्वता येणे इत्यादी अशाप्रकारे ज्या विद्यार्थ्यांमध्ये अशी परिपक्वता आलेली असते तो विद्यार्थी समाजामध्ये आपल्या स्वतःचे योग्य समायोजन करु शकतो वाढत्या वयोमानानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या व वाईट गुणांची वाढ होत असते व त्याच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्याच्यावर योग्य संस्कार होत असतात व त्याचा परिणाम म्हणून तो चांगली संस्कृती समाजामध्ये रुजवत असतो व त्या विद्यार्थ्यांमध्ये चांगली सामाजिक भावना दृढ होण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांच्या मानसिक परिपक्वता या संकलपनेमध्ये सामाजिक आणि नैतिक अशा गोष्टी येतात विद्यार्थ्यांमध्ये वाढत जाणारी ही मानसिक परिपक्वता त्याच्या शास्वत कृतीला व वैज्ञानिक दृष्टीकोनाला आकार देत असतात. कारण काही घटकामध्ये त्याच्या कल्पना आणि त्याच्या केल्या जाणाऱ्या व्याख्या यामध्ये कधी परिपक्वता आणि कधी अपरिपक्वता दिसून येते.

प्रत्यक्षात भावनिक परिपक्वता ही वैयक्तिक परिणामकारकता तर नाहीच तर त्या घटकाची मदत ही स्वत:तील परिपक्वता वाढण्यासाठी मदत होत असते. विद्यार्थ्यांची वाढ होत असताना भावनिक परिपक्वता ही प्रत्येक स्तरावर परावर्तीत होऊन सामान्य परिपक्वतेचा विकास होतो. भावनिक परिपक्व विद्यार्थी आपल्या भावनावर नियंत्रण ठेवतो तो एखादे निर्णायक मत मांडण्यासाठी विलंब लावतो तसेच कधी लहान मुलासारखे वर्तन न करता तो दयाबुद्धीचा वापर करुन वर्तन करतो.

मार्गन या मानसशास्त्रज्ञाच्या दृष्टीकोनातून भावनिक परिपक्वतेचा सिद्धांत म्हणजे: "वैयक्तिक सामर्थ्यानुसार जीवन जगणे म्हणजे परिपक्वता होय." संशोधकाच्या मते उच्च माध्यमिक विद्यालयातील मुले ही जास्त परिपक्व असतात त्याची ही परिपक्वता त्यांच्या वयानुसार ठरत नसुन त्यांच्या कार्यकुशलतेवरुन व मानसिक परिपक्वतेनुसार ठरत असते. जसे की संशोधनानुसार व संशोधकाच्या अध्ययनानुसार उच्च माध्यमिक शाळेतील मुलांची परिपक्वता अधिक दिसून येते.

२. समस्या विधान :-

"उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती व भावनिक परिपक्वतेचे मापन : एक अभ्यास."

३. कार्यात्मक व्याख्या :-

३.१ उच्च माध्यमिक स्तर :-

औपचारिक शिक्षण पद्धतीमध्ये शासनाच्या नियमानुसार जी शिक्षणाची विभागणी केली आहे त्यापैकी इयत्ता ११ वी व १२ वी ही दोन वर्ग म्हणजेच उच्च माध्यमिक स्तरातील वर्ग होय.

३.२ उच्च माध्यमिक विद्यार्थी :-

सर्वसाधारणपणे शाळेत व शाळेस जोडून असलेले उच्च माध्यमिक या वर्गात शिक्षणघेणाऱ्या मुला-मुलींना विद्यार्थी असे म्हणतात.

३.३ भावनिक परिपक्वता :-

भावनिक परिपक्वता म्हणजे विद्यार्थी प्राप्त परिस्थितीला कसा प्रतिसाद देतो तसेच प्रतिसाद

देत - देत त्याच्या मुक्त भावनावर प्रतिबंध लादून वयस्क व्यक्तिसोबत वावरत असताना आपल्या वर्तनातून मानसिक परिपक्वतेचे दर्शन घडवता त्यालाच भावनिक परिपक्वता असे म्हणतात.

३.४ मापन :-

सर्वसाधारणपणे कोणत्याही बाबींचे मोज-माप करणे किंवा प्रमाणित कसोटीच्या आधारे त्याची उपयोगीता ठरवणे याला त्या बाबींचे केलेले मापन असे म्हणतात.

३.५ अभ्यास :-

एखाद्या विषयाचा शास्त्रशुद्ध पद्धतीने केली जाणारी चिकित्सा म्हणजे अभ्यास होय.

४. संशोधनाची उद्दिष्टे :-

४.१ विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचे मापन करणे.

४.२ उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या भावनिक परिपक्वतेचे मापन करणे.

४.३ उच्च - माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वता क्षमतांचा अभ्यास करणे.

४.४ कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी. शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा अभ्यास करणे.

४.५ विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचे व भावनिक परिपक्वतेचे मापन करणे.

४.६ उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या अभिवृत्तीचे मापन करणे.

४.७ उच्च - माध्यमिक स्तरावरील ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचा क्षमतांचा अभ्यास करणे.

४.८ कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी. शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे.

५. संशोधनाची गृहीतके :-

५.१ उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करता या विद्यार्थ्यांमध्ये भावनिक परिपक्वता आढळून येते.

५.२ भावनिक परिपक्वता विकसित झाली आहे का हे पाहण्यासाठी शासन स्तरावरुन शिक्षकाना प्रशिक्षण दिले जाते.

५.३ भावनिक परिपक्वतेनुसार उच्च - माध्यमिक स्तरावरील मुला-मुलींमध्ये मूलभूत फरक

आढळून येत नाही.

५.४ भावनिक परिपक्वता क्षमतेनुसार ग्रामीण क्षेत्रातील उच्च-माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत फरक आढळत नाही.

५.५ भावनिक परिपक्वता क्षमतेनुसार शहरी क्षेत्रातील उच्च-माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत फरक आढळून येत नाही.

५.६ कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी. अशा विविध शाखेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्कतेत फरक आढळून येत नाही.

६. संशाधनाचे महत्त्व :-

शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे असे म्हटले जाते. कारण शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होतो. हा विकास होत असताना तो विकास हा संतुलित विकास होणे अत्यंत महत्त्वाचे असते कारण जर त्यांचा संतुलित विकास झाला तरच तो समाजामध्ये आपल्या स्वत:चे योग्य प्रकारे समायोजन करु शकतो. कारण त्याची वाढ व विकास होत असताना त्याच्या फक्त शरीराचा विकास होऊन चालत नाही तर त्याच्या मानसिकतेचाही विकास होणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण केवळ शारीरिक विकास झालेली व्यक्ती शारीरिक कामे करु शकते परंतु तशा व्यक्तीचे सामाजिक समायोजन योग्य प्रकारे होऊ शकेल असे सांगता येत नाही. यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास समतोल पद्धतीने झाला पाहिजे तेव्हाच तो विद्यार्थी आपल्या बुद्धी चातुर्याने समाजामध्ये समायोजन साधू शकतो म्हणजेच येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीवर तो मात करु शकतो त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या या वर्तनालाच भावनिक परिक्वता असे म्हणतात. तेव्हा या वयातील विद्यार्थ्यांमध्ये ही परिपक्वता विकसित होण्यासाठी अध्यापकाकडून प्रयत्न झाले पाहिजेत व ही त्या विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे असे संशोधकाला वाटते.

७. संशोधनाची गरज :-

"शिक्षण हे वाघीनीचे दूध आहे आणि जो कोणी हे प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही" असे मत परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले व त्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलेच पाहिजे. प्रस्तुत संशोधनाची गरज आहे असे संशोधकाला वाटते त्याचे कारण असे आहे की संशोधक अध्यापक हा गत १० वर्षापासून उच्च माध्यमिक विद्यालयात अध्यापनाचे कार्य करत असून तो ज्या विद्यार्थ्यांना अध्यापन करतो त्या विद्यार्थ्यांचे शारिरीक वय पाहिले तर हा

कालखंड वाढ व विकासाचा असलेला दिसून येतो. ह्या वयातील विद्यार्थी हे मानसिक अशांतेचा काळात असलेले दिसून येतात. त्यालाच आपण कुमारावस्था किंवा यौवनावस्था असे संबोधतो तेव्हा या कालखंडातील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता क्षमता यांचा अभ्यास केला गेला तर अशा विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करुन त्याना गुन्हेगारी प्रवृत्ती पासून किंवा चूकीच्या मार्गापासून परावृत्त करुन त्यांच्यावर योग्य संस्कार करुन त्यांच्यामध्ये असलेली ऊर्जा ही देशाच्या विधायक कार्यासाठी उपयोगात आणली जाऊ शकते असे संशोधकाला वाटते. कारण मानसिक परिपक्वता सुदृढ असलेले विद्यार्थी म्हणजेच भावनिक परिपक्वता विकसित झालेले विद्यार्थी हे सामाजिक आरोग्य सुव्यवस्थित ठेवण्यासाठी मदत करतात म्हणून संशोधकाला या विषयाची गरज असल्याचे वाटते त्यामुळे त्यानी हे संशोधन विषय निवडला आहे.

८. संशोधनाची व्याप्ती :-

८.१ क्षेत्र व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे इयत्ता ११ वी ते १२ वी या वर्गात शिकणारे लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यां पुरते मर्यादित आहे.

८.२ कालावधी :-

प्रस्तुत संशोधन कार्य पीएच.डी. या पदवीसाठी सन २०१६ ते २०१९ या कालावधी एवढे आहे.

८.३ आशय व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाची आशयव्याप्ती ही अशी आहे की भावनिक परिपक्वता विकसित झालेल्या विद्यार्थ्यामुळे तो आपले जीवन जगत असताना समाजामध्ये कसे समायोजन साधायचे याचे ज्ञान मिळवून त्या ज्ञानाचा उपयोग कसा करतो.

८.४ नमूना व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे लातूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेशी संबंधित आहे.

९.संशोधनाच्या मर्यादा :-

९.१ क्षेत्र मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे फक्त लातूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या

अभिवृत्ती व भावनिक परिपक्वतेच्या अभ्यासापूरते मर्यादित आहे.

९.२ कालावधी मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे २०१६ ते २०१९ या कालावधीपूरतेच मर्यादित आहे.

९.३ आशय मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती व भावनिक परिपक्वते विषयी येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करुन या स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना सूचवण्याच्या दृष्टीने विशेष संदर्भात लातूर जिल्ह्यापूरते मर्यादित आहे.

४) नमूना मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्य उच्च माध्यमिक स्तर (+ २ स्तर) लातूर जिल्ह्यातील कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी. या शाखेतील विद्यार्थ्यांपूरते मर्यादित आहे.

१०. संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन हे वर्तमानकालीन असल्याने संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रतिसादकांकडून माहिती संकलित करण्यासाठी खालील साधनांचा वापर करणार आहे.

११. संशोधनाची साधने :-

१) प्रश्नावली

२) मुलाखत

३) निरीक्षण सूची

असे संशोधनाचे अनेक साधने आहेत मात्र संशोधकाने प्रश्नावली (डॉ. यशवीर सिंग व डॉ. महेश भार्गव यांची भावनिक परिपक्वता श्रेणी) आणि अभिवृत्तीसाठी (डॉ. विष्णु पेठेकर, पुणे विद्यापीठ) हे साधन वापरले आहे

१२. जनसंख्या :-

प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या ही लातूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील (+ स्तर) सर्वच शाखेतील (कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी.) चे विद्यार्थी असतील.

१३. नमुना निवड :-

नमुना निवडीच्या अनेक पद्धती आहेत मात्र संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी लॉटरी पद्धतीने १० टक्के उच्च माध्यमिक विद्यालयाची निवड करुन त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

१४. प्रत्यक्ष कार्यवाही :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधक हा उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक परिपक्वतेच्या क्षमते विषयी डॉ. यशवीर सिंग व डॉ. महेश भार्गव यानी विकसित केलेली भावनिक परिपक्वता श्रेणीचा उपयोग करुन संकलित केलेल्या माहितीवरुन संशोधन करणार आहे. या भावनिक परिपक्वता श्रेणीमध्ये एकूण ४८ घटक सांगितलेले आहेत. या घटकापैकी केवळ ५ घटकाचे वर्गीकरण करुन त्यातील भावनिक परिपक्वता या घटकांचे ५ श्रेणीत वर्गीकरण करुन त्यातील भावनिक परिपक्वता या घटकाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधक सर्व प्रथम निवड केलेल्या प्रतिसादकाना प्रश्नावली देऊन त्यांच्याकडून ती प्रश्नावली भरुन घेऊन त्यांचा प्रतिसाद नोंदवून घेणार आहे. तसेच सर्व प्रश्नावल्या एकत्रित करुन प्रतिसादकांच्या वर्गवारीप्रमाणे विभागणी करुन कसोटी मापनाच्या नियमानुसार गुणांकन करणार आहे. तसेच काही वेळेस प्रतिसादकांच्या प्रतिसादाप्रमाणे त्यांच्या मुलाखती घेऊन व त्यांचे निरीक्षण करुन सुद्धा संशोधक ह्या विषयाचा अभ्यास करणार आहे.

१५. प्रकरण योजना

प्रस्तुत नियोजित संशोधन प्रबंधाची प्रकरण योजना खालील प्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत नियोजित संशोधनात संशोधक संशोधन समस्येच्या अनुषंगाने उपमुद्याची मांडणी करणार आहे. यात संशोधन समस्या, समस्येचे महत्त्व, प्रस्तुत विषयावर संशोधनका महत्त्वाचे आहे याची सविस्तर माहिती सादर करणार आहे.

प्रकरण दुसरे - संशोधनाशी संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात संशोधक आपल्या संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचा अभ्यासकरणार आहे. या अभ्यासात तो आपल्या संशोधन समस्येशी निगडीत यापूर्वी झालेल्या शोध निबंधाचा ज्यात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत प्रकाशित साहित्याचा समावेश आहे अशा साहित्य, संशोधने व शोध निबंध व विविध विद्यापीठातील, ग्रंथालयातील संशोधनाचा उपयोग करुन आढावा घेणार आहे.

प्रकरण तिसरे - संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात संशोधक आपल्या संशोधन कार्याला योग्य अशा सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे. त्याच बरोबर संशोधन पद्धतीचे महत्त्व, वेगळेपण व उपयुक्तता याचा आढावा घेणार आहे. तसेच या प्रकरणात संशोधनाची साधने, नमूना निवड याची तपशीलवार माहिती देणार आहे.

प्रकरण चौथे - माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत प्रकरणात संशोधक ज्या विविध साधनाच्या साह्याने माहिती संकलीत करणार आहे त्या माहितीवर योग्य तालीका करणार आहे. प्रतिसादकांच्या प्रतिसादाच्या आधारे त्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा विचार करुन निष्कर्ष काढणार आहे. तसेच या प्रकरणात योग्य त्या ठिकाणी आलेख, सांख्यकिय तंत्रे यांचा यथायोग्य वापर करणार आहे.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधक हा प्राप्त अर्थनिर्वचानाच्या साह्याने उदिष्टानुरूप निष्कर्ष काढणार आहे. त्याचबरोबर उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भावनिक परिपक्वता क्षमता वाढीसाठी प्राप्त उपाय सुचवणार आहे. तसेच या संशोधन समस्येशी संबंधित संशोधन करणाऱ्या पुढील संशोधकासाठी काही विषयांची शिफारस करणार आहे.

१६. संदर्भ सूची :-

मराठी संदर्भ :

१. आगलावे प्रदिप, (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन.

२. कदम चा.प., (२००५), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन.

३. कुंडले म.भा., शैक्षणिक मानसशास्त्र.

४. गद्रे गीता आणि गद्रे ल.रा., (१९९०), शिक्षणाचा इतिहास, पुणे नूतन प्रकाशन.

५. भिंताडे वि.रा., (२०११), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे नित्यनूतन प्रकाशन.

English References :

1. Best J.W., Research in Education, New Delhi, Prentice Hall of India Private Limited Delhi. Fourth Edition. 1982.

2. Bhargava M. (2006), Modern Psychological Testing and Measurment (Hindi) Agra, H.P. Bhargava Book House.

3. Mohsin S.M. (1960), A Measure of Emotional Maturity, Psychological Stadies, 78-83.

4. Soivastav R.P. (1983). Social Matarity Scale (SMS) in Hindi, Agra, National Psychological Corporation.

संशोधक	मार्गदर्शक
दिपक रामचंद्र नावाडे	**डॉ. गोरोबा तुकारम खुरपे**